पिंपरी चिंचवड महानगरपालिका कॉर्पोरेशन इंटिग्रेटेड हेल्थ ऍण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी

२ रा मजला, वैद्यकिय विभाग, मुख्य प्रशासकीय इमारत,पिंपरी चिंचवड महानगरपालिका, मुंबई-पुणे हायवे लगत, पिंपरी- ४११ ०१८

---

जाहिरात क्र.३६८/२०१७
क्रमांक- वैद्य/९/कावि/२६०/२०१७
दि.२७/०२/२०१७

## Walk- in –Interview (थेट मुलाखत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कॉर्पोरेशन इंटिग्रेटेड हेल्थ ऍण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी अंतर्गत राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM) अंतर्गत आशा स्वयंसेविका (ASHA) नियुक्ती कामी खालील नमुद केलेल्या शैक्षणिक पात्रता व अनुभव धारक उमेदवारांनाकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पदनाम | पद संख्या | शैक्षणिक पात्रता व अनुभव | वय | मुलाखतीचा दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | आशा स्वयंसेविका (ASHA) | २८ | किमान १० वी पास महिला, उच्च शिक्षीत महिलांना प्राधान्य, शासकिय सेवेत लिंक वर्कर व आरोग्य विषयक कामकाजाचा अनुभव असल्यास प्राधान्य. | किमान २५ ते कमाल ४५ वर्षे | दि.८/ ०३/२०१७ सकाळी १० ते ११ वा.पर्यंत. |

**<u>अटी व शर्ती-</u>**

1. राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत भरण्यात येणा-या वरील पदाची निवड थेट मुलाखतीने करण्यात येईल.
2. सदरची पदे राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत राहतील, सदर पदांचा पिंपरी चिंचवड म.न.पा.आस्थापनेशी कसल्याही प्रकारचा संबंध राहणार नाही.
3. सदर पदे केवळ प्रकल्प कामकाजासाठी तात्पुरत्या स्वरुपात भरावयाची असून प्रकल्प बंद होताच सदरील पदे आपोआप संपुष्टात येतील.
4. सदरची पदे पुर्णपणे केवळ प्रकल्प कामकाजासाठी तात्पुरत्या स्वरुपात भरावयाची असल्याने अर्जदारास कायमपदी नियुक्तीचा हक्क सांगता येणार नाही. ज्या दिवशी सोसायटीस सदर पदांची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटीशीशिवाय त्यांची सेवा समाप्त केली जाईल.
5. सदर जाहिरातीमधील पदसंख्येमध्ये बदल होऊ शकतो.
6. सदरची भरती रद्द करणे अथवा स्थगित करणे तसेच निवड/नियुक्ती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार मा.आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी राखुन ठेवलेले आहेत.
7. मुलाखत एकास तीन व चारास आठ (१:३ व ४:८) या प्रमाणे उमेदवारांना मुलाखतीस बोलवण्यात येईल. याकरिता उपरोक्त नमुद करणेत आलेल्या मुलाखतीच्या वेळापत्रकामधील दिनांकास १ तासामध्ये म्हणजे सकाळी १० ते ११ वाजेपर्यंत या वेळेत जेवढे उमेदवार उपस्थित असतील अशा उमेदवादांची हजेरी नोंदवून व त्यांचेकडून विहित नमुन्यातील अर्ज व कागदपत्रे घेण्यात येतील. त्यानंतर उपस्थित असलेल्या उमेदवारांची मुलाखतीसाठी नोंदणी करणेत येणार नाही व याबाबतचा अंतिम निर्णय मा.सदस्य सचिव तथा वैद्यकिय संचालक पि.चिं.म.न.पा. यांचा राहील.
8. आशा स्वयंसेविका म.न.पा. रुग्णालय प्रभागाची स्थानिक/कायमची रहिवाशी असावी.
9. आशा स्वयंसेविकेस मासिक ठोक वेतन, मानधन अथवा कोणताही एकत्रित दरमहा भत्ता अदा केला जाणार नाही

10. नियुक्त आशा स्वयंसेविकेस खालील प्रमाणे कामावर आधारित मोबदला अदा केला जाईल.

| अ.क्र. | आशा स्वयंसेविकेने करावयाची कामे | अदा केला जाणारा कामावर आधारित मोबदला |
|---|---|---|
| १ | प्रसुतीपुर्व कालावधीत गर्भवती महिलांच्या तपासण्या पुर्ण केल्यास | रु.२००/- प्रती गर्भवती महिला |
| २ | गर्भवती महिलेस संस्थात्मक प्रसुतीकरीता प्रवृत्त केल्यास | रु.२००/- प्रती शासकीय आरोग्य संस्थेत प्रसुतीसाठी |
| ३ | १५ ते ४९ वयोगटातील महिलेच्या मृत्युची सुचना नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रास दिल्यास | रु.२००/- प्रती सुचना |
| ४ | नवजात शिशुंची गृहस्तरावर काळजी (एच.बी.एन.सी.) | रु.२५०/- प्रती नवजात बालक |
| ५ | NRC (Nutrition Rehabilitation Center) मधुन बाहेरच्या आलेल्या बालकांचा पाठपुरावा | रु.५०/- प्रती भेट एकुण रु.१५०/- |
| ६ | कमी वजनाच्या बालकाचा पाठपुरावा केल्यास | रु.५०/- प्रती बालक (तीन भेटीसाठी) |
| ७ | बालकांचे लसीकरण (बालक वयोगट ० ते १ वर्ष) | रु.१००/- प्रती बालक |
| ८ | बालकांचे लसीकरण (बालक वयोगट १ ते २ वर्ष) | रु.५०/- प्रती बालक |
| ९ | पल्स पोलिओ अभियान (बुथ अटेंडन्स) | रु.९५/- |
| १० | पल्स पोलिओ अभियान (आय.पी.पी.आय.४ दिवस | रु.७५/- प्रती दिन (एकुण ४ दिवस) |
| ११ | नवविवाहीतांना दोन वर्षापर्यंत अपत्य न होण्याकरीता प्रवृत्त केल्यास. | रु.५००/- प्रती लाभार्थी |
| १२ | एक अपत्य असलेल्यांनी दुसरे अपत्य ३ वर्ष न होण्यास प्रवृत्त केल्यास | रु.५००/- प्रती लाभार्थी |
| १३ | दोन मुलांनंतर जोडप्याने कायमची कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया केल्यास | रु.१०००/- प्रती लाभार्थी |
| १४ | स्त्री शस्त्रक्रियेस प्रवृत्त केल्यास | रु.१५०/- प्रती शस्त्रक्रिया |
| १५ | पुरुष शस्त्रक्रियेस प्रवृत्त केल्यास | रु.२००/- |
| १६ | गर्भनिरोधक साधनांचे वितरण | कंडोम प्रती पॅक रु.१/-<br>आपतकालीन गोळया रु.२/-<br>तोंडाद्वारे घ्यावयाच्या गोळया रु.२/- |
| १७ | पी.पी.आय.यु.सी.डी. अंतर्गत तांबी बसविणेकरीता महिलांना प्रवृत्त केल्यास | रु.१५०/- प्रती महिला |
| १८ | किशोरवयीन मुलींना सॅनिटरी नॅपकिनचे वाटप केल्यास | रु.१/- प्रती सॅनिटरी नॅपकिनच्या विक्रीतुन प्राप्त होईल. |
| १९ | दरमहा ग्रामपातळीवर किशोरवयीन मुलींच्या बैठक आयोजित करणे | प्रती बैठक रु.५०/- |
| २० | डॉट्स अंतर्गत कॅट १ (आरएनटीसीपी) उपचाराकरीता | रु.१०००/- प्रती लाभार्थी |
| २१ | डॉट्स अंतर्गत कॅट २ (आरएनटीसीपी) उपचाराकरीता | रु.१५००/- प्रती लाभार्थी |
| २२ | एम.डी.आर/एक्स.डि.आर.(आरएनटीसीपी) उपचाराकरीता | रु.३०००/- प्रती लाभार्थी |
| २३ | कुष्ठरोगाची नविन केस शोधल्यास | रु.२५०/-कुष्ठरोगाची नवीन केस |
| २४ | कुष्ठरोगाच्या एम.बी.केसचा उपचार पुर्ण केल्यास | रु.६००/- प्रती केस |
| २५ | कुष्ठरोगाच्या पी.बी.केसचा उपचार पुर्ण केल्यास | र.४००/- प्रती केस |
| २६ | संशयीत हिवताप रुग्णाचे रक्त नमुने (बी.एस.) | रु.१५/- बी.एस प्रती रक्त नमुना |
| २७ | हिवतापाच्या पी.व्ही.रुग्णाचा उपचार केल्यास | र.७५/- प्रती रुग्ण |
| २८ | हिवतापाच्या पी.एफ.चा उपचार केल्यास | र.७५/- प्रती रुग्ण |
| २९ | हिवतावाचा पुर्ण उपचार केल्यास | र.३००/- प्रती रुग्ण |
| ३० | हायड्रोसिल रुग्णांची यादी तयार केल्यास | रु.२००/- |

| | | |
|---|---|---|
| ३१ | हत्तीरोग असलेल्या रुग्णाचे व्यवस्थापन केल्यास | रु.२००/- प्रती रुग्ण |
| ३२ | तीव्र मेंदूदाह/जपानी मेंदूदाह रुग्णांना संदर्भसेवा दिल्यास | रु.३००/- प्रती रुग्ण |
| ३३ | नागरी आरोग्य आणि पोषण दिनास किंवा बाहयसंपर्क लसीकरण सत्राकरीता | रु.२००/- प्रती सत्र |
| ३४ | महिला आरोग्य समितीची मासिक बैठक आयोजित करणे आणि मार्गदर्शन करणे | रु.१५०/- प्रती बैठक |
| ३५ | नागरी-प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावरील मासिक बैठकीस उपस्थित राहाणे | रु.१५०/- |
| ३६ | आशा स्वयंसेविकेने माहिती व अहवालाचे अचुक संकलन केल्यास | रु.५००/-दरमहा |

11. जास्त उमेदवार आल्यास छाननीअंती एका पदास पाच उमेदवार या प्रमाणे शैक्षणिक पात्रतेच्या अंतिम वर्षाच्या परिक्षेतील गुणवत्तेनुसार मुलाखतीसाठी गुणांचा कट ऑफ लावण्यात येईल.
12. सदर पदांची मुलाखत १५ गुणांची असेल.
13. सदर पदाचे मुलाखतीमध्ये खालील प्रमाणे गुण देण्यात येतील.

अ) किमान १० वी पास महिला असणे आवश्यक, १० वी पास असल्यास शुन्य गुण व त्यापुढील प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या पात्रतेसाठी २ गुण या प्रमाणे गुण देण्यात येतील. (उदा.१२ वी पास असल्यास ४ गुण, निवड समितीस जास्ती जास्त ६ गुण दणेत येतील.)

ब) आरोग्य विषयक कामकाजाच्या अनुभव प्रत्येक वर्षाच्या अनुभवासाठी १ गुण देण्यात येतील. चांगल्या स्वयंसेवी संस्थेची कार्यकर्ती असल्यास अधिक गुण देण्यात येतील. (जास्ती जास्त ५ गुण देण्यात येतील.)

क) विधवा/परितक्त्या महिला असल्यास ०२ गुण देण्यात येतील.

ड) उत्तम संभाषण व प्रोत्साहन कौशल्यास जास्तीत जास्त २ गुण देण्यात येतील.

14. अनुभवाच्या बाबतीत फक्त शासकिय, निमशासकिय, स्थानिक स्वराज्य संस्था यांचा अथवा राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत असणारा अनुभव ग्राहय धरण्यात येतील.
15. मुलाखतीस पात्र असलेल्या उमेदवारांनी खालील कागदपत्रांसह स्वखर्चाने मुलाखतीत राहवे. त्यांना कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता देय नाही.

कागदपत्रे-

१. इच्छुक व पात्र उमेदवारांनी थेट मुलाखतीला येताना म.न.पा.वेबसाईट www.pcmcindia.gov.in वर दिलेल्या नमुन्यातील अर्ज, शैक्षणीक अर्हता प्रामणपत्रे व खालील कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रती जोडाव्यात. अर्जासोबत मुळ कागदपत्रे जोडून नयेत. २. पासपोट्र साईज फोटो ३. जन्म दाखलेचा पुरावा (जन्माचा दाखला/शाळा सोडल्याचा दाखला) ४. रहिवाशी दाखला ५. ओळख प्रमाणपत्र ६. अनुभव प्रमाणपत्र

16. मुलाखतीचे ठिकाण- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय, १ ला मजला चाणक्य हॉल.

सही/-
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

सही/-
**वैद्यकिय संचालक**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

<u>आशा स्वयंसेविका पदासाठी अर्जाचा नमुना</u>

| या ठिकाणी पासपोर्ट साईज फोटो चिटकवावा. |
|---|

**प्रति,**

**मा.सदस्य सचिव,**
कॉर्पोरेशन इंटिग्रेटेड हेल्थ ऍण्ड फॅमिली
वेलफेअर सोसायटी पी.सी.एम.सी.
२ रा मजला, वैद्यकिय विभाग, मुख्य प्रशासकीय इमारत,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, मुंबई-पुणे हायवे लगत, पिंपरी- ४११ ०१८

**विषय- ------------------------------------------ या पदासाठी अर्ज**

**महोदय,**

संदर्भीय जाहीरातीनुसार मी -------------------------- पद -------------- हया तात्पुरत्या स्वरुपातील हंगामी पदासाठी आवश्यक अर्हता धारण करीत असून निवड होण्याकरीता विहीत नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे.

माझी तपशीलवार माहिती खालील प्रमाणे-

१) संपूर्ण नांव- ---------------------------------------------------------------------------------

२) पत्रव्यवहाराचा संपर्ण पत्ता--------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------

३) मोबईल क्रमांक -----------------------------------------------------------------------------

४) ई-मेल आयडी--------------------------------------------------------------------------------

५) धर्म- --------------------- ६) जात---------------------- ७) प्रवर्ग- ------------------------

७) जन्मतारीख------------------------------------ व वय -------------------------------------

८) अर्जदाराची माहिती-

| अ.क्र. | पात्रतेच्या अटी | अर्जदाराने भरावयाची माहिती | (फक्त कार्यालयीन कामासाठी) अर्जदाराने यामध्ये माहिती भरु नये | |
|---|---|---|---|---|
| | | | निर्धारित गुण | प्राप्त गुण |
| १ | शैक्षणिक पात्रता | | ६ | |
| २ | कामाचा अनुभव (वर्षामध्ये लिहावे ) | | ५ | |
| ३ | विधवा परितक्त्या (होय किंवा नाही लिहावे) | | २ | |
| ४ | संभाषण कौशल्य व प्रोत्साहन कला अवगत (होय किंवा नाही लिहावे) | | २ | |

९) तांत्रिक व इतर अर्हता तपशील- ------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------------

वर नमुद केलेला तपशील खरा व बराबर असून त्याबाबत आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित प्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकिची आढळून

आल्यास या माहितीच्या आधारे मिळालेली तात्पुरत्या स्वरुपातील हंगामी नोकरीवरुन कमी करण्यास मी पात्र राहीन, तसेच माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई प्रस्तावीत होईल, याची मला जाणीव आहे.

स्थळ- अर्जदारची सही-

दिनांक- / /२०१७ (नांव- )

टिप : १) अर्जदाराने शैक्षणिक पात्रता व कामाच्या अनुभवाचे प्रमाण पत्र सोबत जोडावेत.

२) अपुर्ण भरलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.